प्रेसनोट

दि.१३.१०.२०२१

**शिर्षक -** तक्रारदार यांचे पत्नीला अटक न करण्यसाठी व गुन्हयात मदत करण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/- रुपयेची मागणी करुन त्यापैकी पहीला टप्पा म्हणुन ७०००/- इतकी लाच रक्कम स्वतः स्विकारुन आलोसे / श्री. शशिकांत तुकाराम वलेकर वय- ४९ वर्षे, पोलीस नाईक, करमाळा पोलीस ठाणे यांचे विरुध्द गुन्हा दाखल

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परीक्षेत्र, सोलापूर युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | करमाळा पो.स्टे.सोलापुर ग्रामीण, गु.र.नं. /२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | श्री.शशिकांत तुकाराम वलेकर, पोलीस नाईक बक्कल नंबर.३२४, नेमणुक- करमाळा पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण रा. शेलगांव ता.करमाळा जि. सोलापूर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १००००/-रु. मागणी करुन त्यापैकी पहीला टप्पा म्हणुन ७०००/- रुपये स्विकारले. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार व त्यांची पत्नी, मुलगा यांचेवर करमाळा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास यातील आलोसे हे करत होते. त्या गुन्हयामध्ये तक्रारदार यांची पत्नीला अटक न करण्यासाठी व गुन्हयात मदत करण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/- रुपयेची मागणी करुन त्यापैकी पहीला टप्पा म्हणुन ७०००/- रुपये इतकी लाच रक्कम स्वतः स्विकारली म्हणून आलोसे शशिकांत तुकाराम वलेकर यांचेविरुध्द लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.सुरज गुरव अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.संजीव पाटील, पोलीस उपअधिक्षक, पर्यवेक्षण अधिकारी, श्री. चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक, पोहवा/ शिरीषकुमार सोनवणे, पोना/प्रमोद पकाले, पोना/अतुल घाडगे सर्व नेम ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास, अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो, रंगभवन चौक, सोलापूर ४१३४०३.
संकेत स्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- dyspacbsolapur@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२१७-२३१२६६८

(चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.